**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- ONE

---

**गुरुवार, दिनांक ५ मे, २०२२**

# निदेश

क्र. - ३१/२०२२ दिनांक - ५.५.२०२२

**विषय - सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर विद्यापीठातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीचा निदेश, २०२२**

ज्याअर्थी, दि. ७.१२.२०१७ ला व्यवस्थापन परिषदेने बाब क्र. २०८ अन्वये वर्ग-३ व वर्ग-४ मधील विद्यापीठ सेवेतून आणि राज्य शासकीय/निमशासकीय सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त कर्मचा-यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर घेण्यासंदर्भात धोरण निश्चित करण्याकरीता समिती गठीत करण्याचा निर्णय घेतला,

आणि

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने निश्चित केलेल्या उपरोक्त धोरणानुसार गठीत समितीच्या शिफारसी त्यासोबतच्या प्रारूप विनियमासह, दि. २८.११.२०२० ला झालेल्या व्यवस्थापन परिषदेने बाब क्र. ९६ अन्वये मान्य केल्या.

आणि

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या गठीत समितीच्या शिफारसीनुषंगाने विनियम क्र. ४/२०२० दिनांक २८.११.२०२० रोजी अस्तित्वात आला,

आणि

ज्याअर्थी, विनियम क्र. ४/२०२० मध्ये काही बाबी समाविष्ट करणे अनिवार्य झाले आहे.

आणि

ज्याअर्थी, अस्तित्वात असलेल्या विनियमाला त्वरीत दुरूस्ती करणे गरजेचे आहे,

आणि

ज्याअर्थी, विनियम तयार करणे हे अधिष्ठाता मंडळाच्या अधिकार कक्षेत येणारी कृती आहे.

आणि

ज्याअर्थी, प्र-कुलगुरू हे अधिष्ठाता मंडळाचे अध्यक्ष असल्याने व प्र-कुलगुरू पद सध्या रिक्त असल्याने अधिष्ठाता मंडळाच्या नियमित सभा आयोजनामध्ये सातत्यता राहत नसल्याने, विनियमाला तातडीने दुरूस्ती करण्यासाठी निदेश काढणे गरजेचे आहे,

आणि

ज्याअर्थी, विनियम तयार करण्याला अधिक कालावधी लागणार आहे,

त्याअर्थी, मी, डॉ.दिलीप एन.मालखेडे, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करून खालील निदेश प्रसृत करीत आहे.

१. या निदेशाला ñसेवानिवृत्त कर्मचारी यांच्या अस्थायी सेवा एकत्रित मानधनावर विद्यापीठातील वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कामांसाठी घेण्याबाबतच्या कार्यवाहीचा निदेश, २०२२ò असे संबोधण्यात येईल.

२. हा निदेश दिनांक १ एप्रिल, २०२२ पासून अस्तित्वात येईल.

३. विनियम क्र. ४/२०२० (यापुढे यासाठी ñविनियमò असा उल्लेख केला जाईल.) मधील, अ.क्र. ३) **व्याख्या** मधील उल्लेखीत ñब)ò समोरील व्याख्या रद्द/वगळण्यात येत असून, त्याठिकाणी खालील व्याख्या अंतर्भूत करण्यात येत आहे.

ñब) ñसेवानिवृत्त कर्मचारीò म्हणजे महाराष्ट्र राज्यातील कृषी/अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य/केंद्र शासनाच्या सेवेतून अथवा निमशासकीय सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त झालेले नियमीत कर्मचारी तसेच संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेले (कुशल/अकुशल/अकुशल (हलके) वर्गवारीत मोडणारे) एकत्रीत वेतनावरील दैनिक वेतनिक कर्मचारी.

तथापि, महाराष्ट्र राज्य/केंद्र शासनाने जाहीर केलेल्या एकत्रीत स्वेच्छानिवृत्तीच्या धोरणान्वये स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचा-यांना या योजनेमध्ये समाविष्ट करून घेण्याचा अधिकार कुलसचिवांना राहील. (संबंधित कार्यालयाचे या आशयाचे पत्र देणे बंधनकारक असेल.)ò

४. विनियमाच्या अ.क्र. ñ४) क) नियुक्तीò मधील अ.क्र. ñ२)ò समोरील परिच्छेदानंतर खालील उप परीच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.

ñसेवानिवृत्त कर्मचारी हा ज्या विभागात कार्यरत आहे, त्या विभागाच्या विभाग प्रमुखांनी, त्यांचेकडे कामाला असलेल्या कर्मचा-याची वयोमर्यादा ६५ वर्ष पुर्ण होत असेल तर त्या संबंधिताची माहिती आस्थापना विभागास त्वरीत कळवावी. जर अशा कर्मचा-याच्या सेवा पुढे सुरू ठेवावयाच्या असल्यास, त्याने केलेल्या कामाच्या गोषवारा आणि तो शारिरीक/मानसिक दृष्ट्या कार्यक्षम असल्याबाबत सक्षम वैद्यकीय अधिका-यांची स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र मा.कुलसचिवांचे मान्यतेस्तव आस्थापना विभागामार्फत प्रस्तावित करावे.

तथापि, असे करीत असतांना संबंधित सेवानिवृत्त कर्मचारी हा विद्यापीठाच्या नियमित वा एकत्रीत वेतनावरील दैनिक वेतनिक कर्मचारी असल्याची खात्री करून घ्यावी. कुठल्याही परिस्थितीत अन्य आस्थापनेतून आलेल्या सेवानिवृत्त कर्मचा-यांची वाढीव सेवा प्रस्तावित करू नये.ò

५. विनियमाच्या अ.क्र. ñ४) क) नियुक्तीò मधील अ.क्र. ñ५)ò मध्ये असलेल्या ñसेवानिवृत्त कर्मचा-यांची मागणीò या शब्दांनंतर आणि ñविभाग प्रमुखांकडूनò या शब्दांआधी असलेल्या ñसंबंधितò या शब्दाऐवजी ñएखाद्याò हा शब्द अंतर्भूत करण्यात येत आहे आणि त्याच्यापुढे असलेल्या ñआवश्यक पुर्ततेसहò या शब्दांनंतर आणि ñआस्थापनाò या शब्दाआधी असलेले ñविभाग प्रमुखांकडूनò हे शब्द वगळण्यात येत आहेत.

६. विनियमाच्या अ.क्र. ñ४) ड) मासिक एकत्रित मानधनò मधील अ.क्र. ñ३)ò रद्द/वगळण्यात येऊन त्याऐवजी नव्याने खालील अ.क्र. ñ३), ४), ५) व ६)ò समाविष्ट करण्यात येत आहे आणि मुळ अ.क्र. ñ४), ५), ६) व ७)ò हे अ.क्र. ñ७), ८), ९) व १०)ò असे पुनर्स्थापीत करण्यात येत आहे.

ñ३) संबंधित सेवानिवृत्त कर्मचारी, कार्यालयीन सुटीव्यतिरिक्त कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कुठल्याही कारणास्तव कार्यालयात अनुपस्थित राहील्यास, त्या दिवसाचे मानधन, दरमहा एकत्रित मानधनाच्या प्रतिदिन अनुपातात, म्हणजे वर्ग-३ संवर्गातील कर्मचा-यांसाठी प्रती दिवस रू. ५००/- व वर्ग-४ संवर्गातील कर्मचा-यांसाठी प्रती दिवस रू. २८३/- याप्रमाणे कपात केली जाईल.

४) जर एखादा कर्मचारी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी अनुपस्थित असेल व कार्यालयीन गरजेनुसार विभाग प्रमुखाच्या आदेशाने सुटीच्या दिवशी उपस्थित असेल तर कार्यालयीन कामकाजाच्या दिवसाची अनुपस्थिती कुठल्याही परिस्थितीत उपस्थित असल्याचे गृहीत धरण्यात अथवा दाखविता येणार नाही.

५) **व्यवसाय कर कपात करणे** - ज्या सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात आल्या आहेत व त्यांना मिळणा-या मासीक एकत्रित मानधनाच्या वित्तलब्धीमधून प्रतिमहा व्यवसाय कर खालीलप्रमाणे कपात करण्यात यावा.

| **अ.क्र.** | **मासिक मानधन (रूपयात)** | **व्यवसाय कर (रूपयात)** |
|---|---|---|
| १. | ७५००/- पर्यंत (पुरूष) | निरंक |
| २. | १००००/- पर्यंत (महिला) | निरंक |
| ३. | ७५०१/- ते १००००/- पर्यंत (पुरूष) | १७५/- |
| ४. | १०००१/- व त्यापेक्षा अधिक (पुरूष/महिला) | २००/- |

तथापि, रू. २००/- व्यवसाय कर लागणा-यांकडून माहे फेब्रुवारीच्या मानधनातून रू. ३००/- कपात करावी. जेणेकरून वार्षिक कपात रू. २५००/- एवढी होईल. तसेच यापुढे वेळोवेळी व्यवसाय कर कपातीमध्ये होणारे अनुषंगीक बदल जसेच्या तसे लागू होतील.

६) **व्यवसाय करातून सूट** - खालील निकष पुर्ण करणा-या कर्मचा-यांना व्यवसाय करामधून सूट राहील.

अ) ६५ वर्षापेक्षा अधिक वय असलेले कर्मचारी

आ) ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांगता असलेले कर्मचारी (सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

इ) ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक दिव्यांग पाल्याचे पालकत्व असलेले कर्मचारी (सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)ò

७. विनियमाच्या अ.क्र. ñ४) इ) इतर अटी व शर्तीò मधील अ.क्र. ñ२)ò समोरील परिच्छेदानंतर खालील उप परीच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे.

ñवर्ग-३ व वर्ग-४ मध्ये नियुक्त कर्मचा-यांना त्यांच्या नेमून दिलेल्या विभागात, विभाग प्रमुखांनी सोपविलेली कामे पूर्ण निष्ठेने करावी लागतील. तसेच कर्तव्यस्थानाव्यतिरिक्त इच्छित स्थानावर स्थानांतरण मागण्याचा हक्क राहणार नाही. तथापि, कार्यालयीन कामाची निकड लक्षात घेता एखाद्याचे स्थानांतरण करण्याचा अधिकार प्रशासन विभागाकडे राखून ठेवण्यात आला आहे.ò

स्वा/-

अमरावती. (डॉ.दिलीप एन.मालखेडे)

दिनांक - ३०.४.२०२२ कुलगुरू